# पुणे मेट्रो गुणवत्ता नियंत्रक सप्ताह उत्साहाने साजरा




पुणे, २० नोव्हेंबर २०१९ : पुणे शहरात वनाज ते रामवाडी व पीसीएमसी ते स्वारगेट या दोन मार्गिके मध्ये मेट्रोचे काम सुरु आहे. पुणे शहरात आतापर्यंतचा शहरातील सर्वात मोठा प्रोजेक्ट मध्ये पुणे मेट्रो प्रोजेक्टची गणना केली जाऊ शकते. मेट्रो उभारणीचे काम आंतरशाखीय तंत्रज्ञानावर आधारित असून स्थापत्य अभियांत्रिकी , यांत्रिकी अभियांत्रिकी , इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी, इलेक्टोनिक अभियांत्रिकी, कॉम्पुटर अभियांत्रिकी इत्यादी अनेक तंत्रज्ञानाच्या शाखेच्या अभ्यासाचा वापर मेट्रो उभारणीत केला जातो. सध्या पुणे शहरात मेट्रो खांब उभारणीचे काम उन्नत मार्गिकेत मोठ्या प्रमाणात चालू आहे . या उन्नत मार्गिकेसाठी मोठ्या प्रमाणावर सिमेंट काँक्रीटची आवश्यकता असते. मेट्रोने पुणे शहरात ४ ठिकाणी सिमेंट काँक्रिट (Ready to Mix) बनविण्यासाठी बॅचिंग प्लान्ट व कास्टिंग यार्डची उभारणी केली आहे. या बॅचिंग प्लान्ट मध्ये कॉम्पुटर नियंत्रित गुणवत्ता नियंत्रक प्रणालीचा वापर केला गेला आहे. त्यामुळे मेट्रो बांधकामात वापरण्यात येणारे काँक्रिटच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यास मदत होते. मेट्रोने काँक्रिटच्या गुणवत्ता

तपासणी साठी सर्व प्रकारच्या चाचण्या करण्यास अद्ययावत प्रयोगशाळांची उभारणी प्रत्येक कास्टिंग यार्डात करण्यात आली आहे. तसेच गुणवत्ता नियंत्रण क्षेत्रात जगप्रसिद्ध असलेली ब्युरो व्हेरिटास कंपनीच्या साहाय्याने मध्यवर्ती प्रयोगशाळा महामेट्रोने सिविल कोर्ट कार्यालयात उभारण्यात आली आहे . गुणवत्ता नियंत्रणासाठी मेट्रो सल्लागार व कॉन्ट्रॅक्टर यांनी स्वतंत्र अभियंत्याची नेमणूक केली आहे. हे गुणवत्ता नियंत्रक अधिकारी काँक्रिटच्या प्रत्येक बॅचच्या नमुन्याचे परीक्षण करतात व त्यावर योग्य ती कारवाई करतात. बॅचिंग प्लान्ट पासून ट्रान्सिस्ट मिक्सर वाहनांद्वारे काँक्रिट कार्यस्थळावर घेऊन जाण्यात येते व कार्यस्थळी त्याची गुणवत्ता पुन्हा एकदा तपासण्यात येते. सर्व ट्रान्सिस्ट मिक्सर गाडयांना जिपीएस ट्रॅक प्रणाली लावली आहे. जेणेकरून बॅचिंग प्लान्ट पासून कार्यस्थळावर ट्रान्सिस्ट मिक्सरला किती वेळ लागला यावर नियंत्रण ठेवता येते.




गुणवत्तेविषयक जागरूकता निर्माण करण्यास दरवर्षी तारीख १८ नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर या काळामध्ये गुणवत्ता नियंत्रक सप्ताह साजरा केला जातो . या अनुषंगाने चर्चासत्र व प्रात्यक्षिक आयोजित केले जाते. जेणेकरून मेट्रोने प्रत्येक कर्मचाऱ्यांमध्ये गुणवत्तेविषयी जागरूकता निर्माण करता येइल.

महामेट्रोच्या विविध विभागांमध्ये यावर्षी गुणवत्ता नियंत्रक सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ . ब्रिजेश दीक्षित यांनी म्हटले आहे की, महामेट्रो गुणवत्तेबाबत अत्यंत जागरूक असून महामेट्रोचे काम जागतिक दर्जाचे गुणवत्ता निकषांनुसार करण्यात येत आहे.